# प्रेस नोट

| | | |
|---|---|---|
| 1 | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नांदेड |
| 2 | पोलीस स्टेशन | पो.स्टे मुखेड जि.नांदेड |
| 3 | गुरनं व कलम | गु.र.नं. १३७/२०२६ कलम ७, ७ A भ्र.प्र.अ. १९८८ अन्वये |
| 4 | तक्रारदार | पुरुष, वय २६ वर्षे |
| 5 | आरोपी लोकसेवक | १. अमोल राठोड, विस्तार अधिकारी (कृषी), गट क, पंचायत समिती मुखेड, जि. नांदेड.<br>२. गणपतराव शिंदे (खाजगी इसम), सेवानिवृत्त विस्तार अधिकारी (कृषी), रा. मुखेड, जि. नांदेड. |
| 6 | गुन्हा घडला तारीख व वेळ व ठिकाण | दिनांक २६/०२/२०२६ चे १५:२० ते २१/०५/२०२६ चे २२:३० वाजता पावेतो मौ.होकर्णा रोड, चिवळी रोड तसेच पंचायत समिती कार्यालय मुखेड |
| 7 | गुन्हा दाखल तारीख व वेळ | दिनांक २२/०५/२०२६ चे १७:१८ वाजता |
| 8 | मागणी केलेली रक्कम | 25000/– |
| 9 | स्विकारलेली रक्कम | निरंक |
| 10 | **थोडक्यात माहिती –** | |

तक्रारदार यांच्या मोठ्या भावाच्या नावे मौजे कुंद्राळा येथील शेत गट क्र. 92 मध्ये 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वावलंबनधविशेष घटक योजना' अंतर्गत सिंचन विहीर मंजूर झाली होती. विहिरीचे खोदकाम पूर्ण झाल्यावर सिमेंटचे कडे टाकण्यासाठी दुसरा हप्ता रूपये 2,05,000/– मंजूर करून बँकेत जमा करण्यासाठी, आरोपी लोकसेवक अमोल राठोड यांनी सेवानिवृत्त विस्तार अधिकारी गणपतराव शिंदे यांच्या मार्फतीने रूपये 25,000/– लाचेची मागणी केली.

दिनांक 26/02/2026 रोजी तक्रारदार यांचे मोबाईलवरून लोकसेवक अमोल राठोड यांचे मोबाईलवर भेटण्यासाठी कॉल केला, त्यावेळी लोकसेवक अमोल राठोड आणि सेवानिवृत्त विस्तार अधिकारी शिंदे एकत्र होते. त्यावेळी लोकसेवक अमोल राठोड यांनी तक्रारदार यांना फोनवर काल जेवढे बोलले, जे आहे तेच करा असे बोलून स्पष्ट लाचेची मागणी केली आणि लगेच त्यांचे चालू असलेल्या मोबाईलवर त्यांचेसोबत हजर असलेले सेवानिवृत्त विस्तार अधिकारी शिंदे यांनी फोनवर तक्रारदार यांना, ते बोलले तेवढया द्या, असे बोलून चर्चे दरम्यान 25,000/– रूपये लाचेची मागणी केली त्यामध्ये प्रथम 20,000/– रुपये व काम झाल्यानंतर 5,000/– रुपये लाच स्वीकारण्यास सहमती दर्शविली.

दिनांक 27/02/2026 रोजी तक्रारदार यांनी सेवानिवृत्त विस्तार अधिकारी शिंदे यांना कॉल केला असता, त्यांनी लाचेची रक्कम दुस–याकडे देण्यास सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी त्यास नकार दिला. त्यानंतर परत दिनांक 04/03/2026 रोजी तक्रारदार यांनी पंचायत समिती, मुखेड येथे सेवानिवृत्त विस्तार अधिकारी शिंदे यांची भेट घेवून त्यांना लाचेची रक्कम देण्याचा प्रयत्न केला असता, शिंदे यांनी त्यांचे ओळखीच्या दुकानामध्ये देण्यास सांगितले परंतु त्या दुकानदाराने तक्रारदार यांचेकडून लाचेची रक्कम स्वीकारण्यास नकार दिला

त्यानंतर दिनांक 20/05/2026 व दिनांक 21/05/2026 रोजी तक्रारदार यांनी लाच रक्कम देण्यासाठी सेवानिवृत्त विस्तार अधिकारी शिंदे यांचे मोबाईलवर लाच स्वीकृती करीता फोन केला असता, त्यांनी फोन उचलला नाही. व सेवानिवृत्त विस्तार अधिकारी शिंदे यांना तक्रारदार यांचा संशय आल्याने त्यांनी लाच स्विकृती केली नाही. म्हणुन पोस्टे मुखेड नांदेड येथे गुरनं 137/2026 कलम ७, ७ A भ्र.प्र.अ. १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची सापळा कारवाई मा. श्री संदीप पालवे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांच्या मार्गदर्शनानुसार ला.प्र.वि. नांदेड चे पोलीस उप अधीक्षक प्रशांत पवार, पोलीस निरीक्षक श्री. सुरेश बनसोडे व नांदेड युनिट पथक यांनी पार पाडली.

तरी सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात खालील क्रमांकावर संपर्क करावा.

| | |
|---|---|
| **१) संदीप पालवे, पोलीस अधीक्षक** | – ०२४६२ – २५५८११, मो.नं. ९२२६४८४६९९ |
| **२) श्री प्रशांत पवार, पोलीस उप अधीक्षक** | – मो.नं. ९३५९०५६८४०. |
| **३) टोल फ्रि** | – १०६४ |
| **४) ला.प्र.वि. नांदेड दुरध्वनी क्रमांक** | – ०२४६२ – २५३५१२ |
| **५) Website** | – **www.acbmaharashtra.gov.in** |
| **६) Mobile App** | – **www.acbmaharashtra.net** |
| **७) Facebook Page** | – **www.facebook.com/maharashtraACB** |
| **८) Twitter** | – **@ACBnanded** |
| **९) Instagram** | – **acb_nanded** |
| **१०) Youtube Cahnnel** | – **@AntiCorruptionBureauNanded** |
| **११) whats App number** | – ८९५६५०१०६४ |

कार्यालय, पोलीस उप अधीक्षक ला.प्र.विभाग, नांदेड युनिट

**पोलीस उप अधीक्षक**
**ला.प्र.विभाग,नांदेड युनिट**

Scanned with OKEN Scanner